# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर वसई विरार यांचेकार्यालय,
रामनगर, सृष्टी, मिरारोड पुर्व. ता.जि. ठाणे
दुरध्वनीक्रमांक ०२२-२९४५१००१
Mail:cpoffice.mb-vv@mahapolice.gon.in


प्रेसनोट १७३ दिनांक- ३०/०६/२०२१

## गांजा व प्रतिबंधीत मॅक्सॉफ सिरप औषध विक्री करतांना एका आरोपीस तलवारीसह अटक. काशिमीरा पोलीस स्टेशनची कारवाई.

दिनांक २६/०६/२०२१ रोजी सपोनि. महेंद्र भामरे, नेम. काशिमीरा पोलीस ठाणे यांना गोपनिय माहिती मिळाली की,'आरोग्य केंद्राचे जवळ, निलकमल नाका काशिमीरा, मिरारोड (पु) येथे एक इसम त्याचे कब्जामध्ये तलवारीसारखे घातक शस्त्र घेवून वावरत आहे.' मिळालेल्या बातमीच्या आधारे सपोनि/महेंद्र भामरे यांनी सदर ठिकाणी त्यांच्या पथकासह सापळा रचुन छापा घातला असता नमुद ठिकाणी काळ्या रंगाची स्विफ्ट कार क्रमांक एम. एच. ०१ ए. ई. २५६५ हिच्यामध्ये संशयीत इसम नामे महजर रशिद शेख, वय-३४ वर्षे, रा-रुम नं-६०९, एम. एम. आर. डी. बिल्डींग, काशिमीरा, मिरारोड (पु), ता. जि-ठाणे हा त्याचे ताब्यामध्ये १) २५.५ इंच लांबीची एक तलवार तसेच २) प्रत्येकी १० ग्राम वजनाच्या ०८ गांजाच्या पुड्या व ३) प्रतिबंधीत मॅक्सॉफ सिरप औषधाच्या ०५ बॉटल्स अशा वस्तु जवळ बाळगतांना व विक्री करतांना मिळून आल्याने त्याचेकडून एकुण १,५३,१९०/- रुपयांचा मुददेमाल जप्त करण्यात आला असुन, सदर प्रकरणी काशिमीरा पोलीस स्टेशन येथे । गुरनं ४५६/२०२१ भारतीय शस्त्र अधिनियम कलम ३, २५ सह महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७ (१), १३५ सह औषधीद्रव्य व सौंदर्य प्रसाधने अधिनियम कलम १८ (अ), १८ (क), २८ (अ), ३७ (ब) व गुंगीकारक औषधी द्रव्ये आणि मनोव्यापारावर परिणाम करणारे अधि. १९८५ चे कलम ८ (क), २० प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयात आरोपीतास अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा अधिक तपास सपोनि. श्री महेंद्र भामरे हे करीत आहेत.

सदरची कामगिरी श्री. अमीत काळे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-१, श्री. विलास सानप, सहायक पोलीस आयुक्त, मिरारोड विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली श्री. संजय हजारे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, काशिमीरा पोलीस स्टेशन, श्री. विजय पवार, पोनि. (गुन्हे), काशिमीरा गुन्हे प्रकटीकरण शाखेचे सपोनि. महेंद्र भामरे, प्रशांत गांगुर्डे, पोउपनि. जावेद मुल्ला, पोना. ३०६२ सुरेश शिंदे, पोशि. २९३८ संतोष तायडे, पोशि. ३६५७ शरद नलवाडे, पोशि. ११६१ स्वप्निल मोहिले, पोशि. ३००८ सुधीर खोत, पोशि. सचिन मोरे यांनी केली आहे.

-----oooo-----